'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 April-May-June 2017
ISSN : 2348-7143
Vol. 4, Issue 2

# गोमंतकीय ख्रिस्ती मराठी साहित्य संशोधन क्षेत्रात प्रा. अ. का. प्रियोळकर यांचे योगदान

**प्रा. विनय मडगांवकर,**
गोवा विद्यापीठ, गोवा.
संपर्क : ८३०८४७७६६४

सतराव्या शतकांत निर्माण झालेल्या या ख्रिस्ती मराठी साहित्यासंदर्भात प्रा. अनंत काकबा प्रियोळकर यांचा 'जेजुइतांचे मराठी वाङ्मय कार्य : ओझरती ओळख' हा अत्यंत महत्वपूर्ण संशोधनात्मक लेख मुंबईच्या 'यशवंत', (एप्रिल १९३८) मासिकाच्या संमेलन खास अकांत प्रसिध्द झाला. डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांच्या मतानुसार ''हा पहिल्यांदाच घडविलेला परदेशी (आणि काही ऐतदेशीय) ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या मराठी भाषा व वाङ्मय यांच्या सेवेचा साधार आणि सविस्तर परिचय होय. बराच काळापर्यंत जवळजवळ अज्ञातावस्थेत असलेले पण पुढे या विषयावर सातत्याने विपुल लेखन करुन या क्षेत्रात प्रियोळकरांनी एकमेवाद्वितीय असा आपला अधिकार प्रस्थापित केला''

या लेखात प्रियोळकर क्रिस्तपुराणाच्या रचनाकारासंदर्भातील संदेहाचे सप्रमाण निराकरण करतात. या विषयी ते लिहितात, ''अस्सल महाराष्ट्रीयाला हेवा वाटावा अशा प्रकारची केलेली ही सुंदर ग्रंथरचना पाहून हा ग्रंथ कोणीतरी आपल्यापैकीच माणसाने लिहून स्टीफन्सच्या नावाने प्रसिध्द तर केला नाही ना, अशी पुष्कळांना शंका येते. स्वत: स्टीफन्सने लिहिलेल्या पोर्तुगीज भाषेतील ख्रिस्त–चरित्रावरुन हे पुराण लिहिले व त्यांचे हे ब्राह्मणी मराठीत भाषांतर स्वत: त्यानेच केले, असा निर्देश या पुस्तकावर असलेल्या ता. ३ एप्रिल १६१४ च्या परवान्यात स्पष्ट आहे. आपल्या हिंदी लोकांना जर इंग्रजी प्रभृती परक्या भाषांमध्ये चांगल्या प्रकारे काव्यरचना करता येते, तर चाळीस वर्षे, बाटलेल्या ब्राह्मणांमध्ये वास्तव्य केलेल्या स्टिफन्सला मराठी ग्रंथ लिहिता येणे अशक्य आहे, असे म्हणता येणार नाही. शिवाय जेजुइत लोकांचा उद्योग, उत्साह व चिकाटी दांडगी होती. ''

प्रियोळकरांच्या या लेखाआधी या ख्रिस्ती मराठी साहित्याचा अल्पपरिचय मराठी वाचकांना झाला होता. १९०६ सालच्या ऑक्टोबरमध्यें मुंबईच्या एसियाटिक सोसायटिच्या शतसांवत्सरिक उत्सवाप्रसंगी श्री जे. एल्. साल्डाणा यांनी फा. स्टिफन्सच्या क्रिस्तपुराणाची ओळख करून दिली. तिच्या आधारे राजारामशास्त्री भागवत यांनी 'विविध ज्ञानविस्तार' मासिकांतून या पुराणाचा परिचय मराठी वाचकांना करून दिला. तद्नंतर १९०७ साली साल्डानाची क्रिस्तपुराणाची रोमन लिपींतील पाठशुध्द प्रत प्रसिध्द झाली. यांवर आधारीत वि. का. राजवाडे यांनी 'स्टिफन्सचें क्रिस्तपुराण' हा लेख लिहिला. या लेखातील त्यांच्या विविध विधानांसंदर्भात प्रियोळकरांनी आपल्या 'क्रिस्तपुराण आणि वि. का. राजवाडे' या लेखात सप्रमाण संदर्भ दिले आहेत.

संशोधनक्षेत्रात त्यांचे कार्य उत्तुंग असेच आहे. ख्रिस्ती मराठी साहित्यासंदर्भात प्रियोळकरांनी मांडलेली त्यांची भुमिका लक्षवेधी होती. ''ख्रिस्तीधर्म हा परका धर्म अशी सबब पुढे करून आपल्या सध्याच्या निष्क्रियतेवर पांघरूण यापुढे घालता येईल, असे वाटत नाही. कारण वाङ्मयाचा विचार करताना यापुढे आपल्या धर्मभिमानाला मुरड घालणे आम्हाला प्राप्त आहे. मराठी भाषेच्या ऐतिहासिक व भाषाशास्त्राच्या दृष्टीने विचार करण्याच्या वेळी तर या वाङ्मयाचे बहुमोल साहाय्य होईल, असे त्यापैकी बरेचसे वाङ्मय लक्षपूर्वक वाचून व अभ्यासून माझे मत झालेले आहे.''

जेजूइतांनी निर्माण केलेल्या साहित्याचे प्रियोळकरांनी प्रकार मानले यां विषयी ते लिहितात, ''जेजूइत वाङ्मयाचे दोन प्रकार आहेत. वरच्या लोकांच्या उपयोगाकरीता तयार केलेले मराठी वाङ्मय, हे सर्व पद्यात आहे,

मुख्यत:खालच्या लोकांकरिता लिहिलेले लोकव्यवहाराच्या भाषेतील कोंकणी किंवा कानारी वाङ्मय हे सर्व गद्य आहे. चर्चमध्ये प्रवचन देण्याच्या पूर्वी जेजुइट लोक प्रथम ती लिहून काढीत व त्यांच्या साहाय्याने प्रवचने देत असे दिसते. ह्या प्रवचनांचे (मतउवदे) संग्रह पुढे प्रसिध्द झाले. या बोलीभाषेतील म्हणजे कोंकणी भाषेतील ग्रामरे, शब्दकोश वगैरे केवळ यूरोपियन धर्मोपदेशकांकरिता तयार करण्यात आले होते. ''

जेजुइत लेखकांच्या भारतातील कार्याशी या ना त्या रुपाने संबंधित असे प्रियोळकरांचे एकंदर ज्ञात लिखाण पुढीलप्रमाणे आढळते. ग्रंथ १) पाद्री तोमस स्टिफन्सकृत दौत्रिन क्रिस्तां (१९६५) २) पिताजी तोमस स्टिफन्सकृत ख्रिस्तपुराण : पुनरुत्थापित येशू—आरंभी थोडेसे (१९४९), ३) मराठी व्याकरणाची लघुकथा (१९३६), (४) फ्रेंच कवीने लिहिलेले मराठी पुराण (१९६५) ५) सांतु आंतोनिची जिवित्वकथा (आ २ री, १९६४), ६) नवनीत शतसांवत्सरिक आवृत्ती (१९५७) ७) सांतु आंतोनिची अचर्या (१९६३), ८) क्रिस्तांचे यातनागीत (१९५१) ९) ग्रांथिक मराठी भाषा आणि कोंकणी बोली (१९६६) १०) गोमंतकाची सरस्वती (१९३५) ११) प्रिय आणि अप्रिय (१९६५) १२) The Printing Press in India ;१९५८), १३) The Goa Inquisition ;१९६१), १४) Goa: Facts versus Fiction ;१९६२), १५) Goa Re-discovered ;१९६७).

यापैकी 'नवा दरवाजा' हा संशोधनात्मक लेखसंग्रह, **'The Goa Inquisition'** स्वतंत्र संशोधनात्मक ग्रंथ, संपादित केलेल्या ग्रंथांपैकी 'सर्वेश्वराचा ज्ञानोपदेश', आंतोनियु–द–सालदाञ्जरचित 'सांतु आंतोनिची जिवित्वकथा', 'क्रिस्ताचे वधस्तंभारोहण', 'ख्रिस्ताचे यातनागीत', या ख्रिस्ती मराठी ग्रंथांचा मी अभ्यास केला. त्याचप्रमाणे त्यांच्या इतर संशोधनात्मक लेखनाचाही परामर्श घेतला.

'ना मुलं लिख्यते किंचित' या तत्वानुसार चिकित्सात्मक अभ्यास करण्याचा त्यांचा पिंड असला तरी त्याची मशागत त्यांच्या पूर्वायुष्यात खडतर परीस्थितीत का होईना योग्य प्रकारे झाली होती. हे मला नमुद करणे आवश्यक वाटते. आत्मचरित्रात आपल्या बालपणासंदर्भात ते लिहितात, ''दर दिवशी रात्री दिवे लागल्याबरोबर आमच्या घरी, श्रीधरांचा हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत, महीपतींचा भक्तलीलामृत, कृष्ण यज्ञवल्कीचा कथा कल्पतरू अशा ग्रंथांचे वाचन चाले. त्याचा आमच्या मनावर फार परिणाम होई.'' आरंभी त्यांचे शिक्षण मराठीत झाले. आपल्या पोर्तुगीज शिक्षणासंदर्भात ते लिहितात, '' मराठी शिक्षण हे हिशेब ठेवणे, आपले धार्मिक ग्रंथ व कथा कादंबऱ्या वाचणे अशाासारख्याकरिता असते. नोकरी मिळण्याच्या बाबतीत त्याचा उपयोग नसतो. हा विचार मनात आणून आम्हांला पोर्तुगीज शाळेत घालण्याचे ठरले.'' पोर्तुगीज शिकवणारा आपला शिक्षक एक पाद्री होता. हे ही ते सांगतात. त्यामुळे पोर्तुगीज व इंग्रजी भाषाभ्यासाबरोबर ख्रिस्ती जीवनप्रणालीचा झालेला परीचय, मराठीचे ज्ञान, प्राचीन मराठी ग्रंथांचा अभ्यास हे सर्व त्यांच्या सशोधकवृत्तीस पोषक ठरले.

प्रियोळकरांच्या संशोधनाचा अभ्यास करतांना मला आणखीन एक विशेष जाणवला. त्यांनी ख्रिस्ती मराठी ग्रंथातील लिपींचा भाषेचा शब्दरूपांचा अभ्यास केलाच, त्याच बरोबर जे लिखित स्वरूपात नाही त्या विषयांचाही ते वेध घेतात. सप्रमाण विवेचन करतात. उदाहरणार्थ 'नवा दरवाजा' या संशोधनात्मक लेखसंग्रहात प्रियोळकर लिहितात, ''बायबलमध्ये क्रिस्ताच्या रंगरूपाचे वर्णन वाचलेले मला आठवत नाही. असे वर्णन नसावें असें मला वाटतें, परंतु फादर तोमस स्टिफन्स याने आपल्या सुप्रसिध्द क्रिस्तपुराणांत क्रिस्ताला युरोपीयन बनविलेले आहे. बुध्द जन्माने भारतीय असतांना चीन व जपानमध्यें त्याचे जे पुतळे किंवा चित्रे तयार केलेली असतात त्याचें चपटे नाक व पिचलेले डोळे दाखवून त्याला मंगोलियन वंशाचा बनलेला असतो. म्हणून बुध्द चिनी किंवा जपानी होत नाही. त्याचप्रमाणे क्रिस्त हा ताम्रगोरा व सोनेरी केसांचा दाखवल्याने तो युरोपीयन होऊ शकत नाही''

प्रियोळकर आणखी एका विषयाकडे सूचक अंगुलीनिर्देश करतात. ११ जानेवारी १९५९ रोजी दैनिक लोकसत्ता मध्ये त्यांचा 'मांसाची फळे' हा लेख प्रसिध्द झाला. त्यात ते लिहीतात, ''क्रिस्ताच्या तेराव्या वर्षापर्यंतच्या हालचालींची नोंद बायबलमध्ये सांपडत नाही.

स्वता: स्टिफन्स लिहितो...

*बारां वरूसांचा होंता शेरिरी । येकि करणी केली संसारी।*
*ति येकिचि कथा पुस्तकावरि । वांजेलिस्ती लिहिली ।। ८५ ।।*
*मग तिसां वरूसांची प्राइ होतां । तिनि वरूसें साहा मास लोकांतु ।*
*शास्त्र सिकउनु वैकुंठपंथु । दाविला तेणे ।। ९० ।। पुराण २, अ. १४*

या तेरा ते तीस वर्षांच्या काळांत क्रिस्ताचे वास्तव्य कोठे होते, या विषयी प्रियोळकर विविध संशोधकांचे संदर्भ देतात.

'सांतु आंतोनिची जिवित्वकथा' रचणाऱ्या आंतुनीयु द साल्दांज यांच्या विषयी प्रियोळकर लिहितात, ''हा कवी जरी सतराव्या शतकांतील असला तरी त्याच्या ग्रंथाची भाषा मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, वामन वगैरे सारख्या कवींसारखी नाही.'' या विधानाची पडताळणी केल्यावर या ग्रंथातील भाषा समर्थसाहित्याशी नाते दर्शवणारी आहे असे मला वाटते.

वि. का. राजवाडे संपादीत ज्ञानेश्वरी, महानुभव पंथतील भास्करभट बोरीकर रचित शिशूपाल वध, तुकाराम गाथा, दमयंती स्वयंवर, हरिविजय या ग्रंथतील विविध शब्दरूपे 'सांतु आंतोनिची जिवित्वकथा' या ख्रिस्ती मराठी ग्रंथात कशाप्रकारे अस्तित्वात आहेत, याचाही ते परामर्श घेतात. शब्दरूपाच्या विश्लेषणाबरोबर त्याच्या सार्थरूपाचे ते स्पष्टीकरण देतात. आवश्यक त्या ठिकाणी कानारी कोशांचाही आधार घेतात. आडखळ, गुडगे, मोनजाती, उतरती यां शब्दरूपांची गोमंतकी बोली म्हणून ते नोंद करतात. या ग्रंथरचनेत समाविष्ट करण्यात आलेले पोर्तुगीज शब्द, त्यांचे रोमन लिपीतील लेखन, त्याचा मराठी अर्थ, ते तळटिपांमध्ये देतात. उदाहरणार्थ 'इंग्रज' ;प्हतमरंद्ध चर्चए मुस्तैरू ;उवदेंजमतलद्ध मठ, कोंसाग्रार ;ब्वदेंहतंतद्ध प्रतिष्ठीत इत्यादी. 'पेशा, वर्तनक्रम' म्हणजे पोर्तुगीज भाषेत **'Habito'.** या शब्दाचा उच्चार करतांना **'H'** चा उच्चार होत नाही म्हणून ग्रंथरचनेत 'आबितू' असे शब्दरूप आले असल्याचे ते स्पष्ट करतात.

प्रियोळकरांनी ख्रिस्ती साहित्याचा अभ्यास केला, त्याच बरोबर त्यांनी ख्रिस्ती संस्कृती व संकल्पनांचाही बारकाव्याने अभ्यास केला होता. 'सांतु आंतोनिची जिवित्वकथा' या ग्रंथातील काही ख्रिस्तीसंस्कृतीशी संबंधीत संकल्पनांचे ते स्पष्टीकरण देतात. होस्ती, 'Hostia' (The word used of Christ present of the altar under the appearance both of bread and wine) भाकरीचा नैवेद्य. मिस 'Missa' रोमन कॅथलिक पंथातील क्रिस्ताचे मांस व रक्त माननेल्या भाकरी व द्रक्षासव यांच्या अर्पणविधीपूर्वक उपासना. कोमुजांव साक्रामेतु (Commushao scramento) कॅथलिक पंथातील एक धार्मिक संस्कार होय, असे ते स्पष्ट करतात.

**या अभ्यासाचे निष्कर्ष असे आहेत.**

- प्रा.प्रियोळकरांनी गोमंतकात निर्माण झालेल्या पण अज्ञात असलेल्या ख्रिस्ती मराठी ग्रंथांचा शोध घेतला.
- काही ख्रिस्ती साहित्यकृतींना त्यांनी पीटर पुराण, क्रिस्ताचे वधस्तंभारोहण, क्रिस्ताचे यातनागीत अशी नावे दिलीत.
- या ख्रिस्ती मराठी साहित्याचे त्यांनी दोन प्रकार मानले.
- धार्मिकतेपेक्षा वाङ्मय म्हणून या साहित्याच्या अभ्यासाला त्यांनी प्राधान्य दिले.

- या संशोधनाच्या निमत्ताने त्यांनी लिप्यंतरशास्त्र, पाठाचिकित्साशास्त्र, संपादनशास्त्र यांचा आदर्श निर्माण केला.
- ख्रिस्ती मराठी साहित्याबरोबर पोर्तुगीज–ख्रिस्ती संस्कृतीचाही त्यांनी अभ्यास केला होता.

**संदर्भग्रंथ :**

१. कुन्हा, टी. बी., गोमंतकीयांच्या राष्ट्रीयत्वाचा ऱ्हास, गोमंतक मराठी अकादमी, गोवा.१९९१
२. शिरोडकर, प्रकाशचंद्र, संपादकद्ध गोमंतकाची मराठी अस्मिता, गोमंतक मराठी अकादमी, गोवा.२००१
३. सरदेसाई, मनोहर हि., गोमंतकीय ख्रिश्चन समाज निर्मिती व कार्य, कला आणि संस्कृती संचालनालय, गोवा.
४. शिरोडकर, पां. पु., इतिहासाच्या दृष्टिकोनातून गोमंतकातील मराठी परंपरेचा उद्‌गम व विकास, गोमंतक मराठी अकादमी, गोवा
५. प्रभुदेसाई, वि. बा., घवी रवींद्र, ;संपादकद्ध गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, गोमंतक मराठी अकादमी, गोवा.
६. प्रियोळकर , अ. का. 'नवा दरवाजा' संशोधनात्मक लेखसंग्रह
७. भेण्डे, सुभाष, ;संपादकद्ध प्रा. अ. का. प्रियोळकर स्मृतिग्रंथ, प्रा. अ. का. प्रियोळकर स्मृतिग्रंथ समिती. मुंबई. १९७४